पिंपरी चिंचवड महानगरपालिका,
पिंपरी ४११ ०१८, सामान्य प्रशासन विभाग
क्रमांक सा.प्र.वि/२/कावि/३०२/२०२४
दिनांक ०७/०६/२०२४

**विषय :-आषाढीवारी पालखी सोहळा सन २०२४ करीता समन्वय अधिकारी नियुक्तीबाबत...**

**आदेश,**

जगद्गुरु संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज यांच्या पालखीचे आगमन अनुक्रमे दि.२९/०६/२०२४ व दि. ३०/०६/२०२४ रोजी पिंपरी चिंचवड महानगरपालिका हद्दीमध्ये होणार आहे. त्याअनुषंगाने पालखी मुक्कामासंबंधी नियोजन व पिंपरी चिंचवड महानगरपालिकेमार्फत पालखी सोहळ्याचे अनुषंगाने इतर तत्सम सेवा सुविधा उपलब्ध करुन दिल्या जात आहेत.

जगद्गुरु संत तुकाराम महाराज व संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी सोहळा निर्विघ्नपणे पार पाडण्यासाठी संबंधी नियोजन, आपत्कालीन नियंत्रण तसेच महापालिकेशी संबंधीत तद्अनुषंगिक कामकाजासंदर्भात मा.जिल्हाधिकारी कार्यालय व विभागीय आयुक्त कार्यालय यांचे मार्फत दिल्या जाणा-या सूचनांनुसार कार्यवाही करणे, तसेच समन्वय राखण्याकरीता खालील नमुद अधिका-यांची नियुक्ती करण्यात येत आहे.

| अ.क्र | मुख्य समन्वयक अधिका-यांचे नावं व पदनाम | समन्वयक अधिका-यांचे नावं व पदनाम | कामकाजाचा तपशिल |
|---|---|---|---|
| १ | २ | ३ | ४ |
| १ | श्री. प्रदिप बापूराव जांभळे पाटील, अतिरिक्त आयुक्त-१, | श्री.भदाणे निलेश शशिकांत, उप आयुक्त मध्यवर्ती भांडार विभाग | जगद्गुरु संत तुकाराम महाराज पालखी |
| | | श्री.घोडके रविकिरण शेषनारायण, उप आयुक्त उद्यान विभाग | संतश्रेष्ठ ज्ञानेश्वर महाराज पालखी |

वरील प्रमाणे पालख्यांचे मुक्कामाचे ठिकाणी व सदर पालखी सोहळा ज्या महानगरपालिका क्षेत्रीय कार्यालयाचे कार्यक्षेत्रामधून जाणार आहे, त्या संबंधित क्षेत्रीय कार्यालयाचे प्रशासन, विद्युत, पाणीपुरवठा, स्थापत्य तसेच आरोग्य विभागाचे संबंधित अधिका-यांनी उपरोक्त अधिकारी यांच्या नियंत्रणाखाली पालखी सोहळ्याच्या अनुषंगाने महानगरपालिकेमार्फत पुरविण्यात येणा-या सेवा सुविधांचे नियोजन करावे. सदर कामकाजासाठी आवश्यक असणारे मनुष्यबळ संबंधित क्षेत्रीय कार्यालयामार्फत/विभागामार्फत उपलब्ध करुन देण्यात यावे. तसेच पालखी सोहळ्याचे अनुषंगाने वरील समन्वय अधिकारी यांनी पालखी सोहळा कालावधीत येणारे भाविकांना सर्व सेवा सुविधा देणेबाबतचे कामकाजाचे नियोजन सर्व विभागप्रमुखांच्या मदतीने करावे. सदर कामकाजासाठी आवश्यक असणारे कामकाज वाटपाचे आदेश माहिती व जनसंपर्क विभाग प्रमुखांनी अलाहिदा स्वतंत्र निर्गत करावेत.

सही/-
(शेखर सिंह)
आयुक्त,
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

प्रति, सर्व संबंधित अधिकारी / विभाग
प्रत : माहिती व जनसंपर्क विभाग

२/-पालखी सोहळ्याशी संबंधित असणारे अधिकारी यांचे संपर्क क्रमांकाची यादी समन्वय अधिकारी यांना उपलब्ध करुन द्यावेत.

(विठ्ठल जोशी)
उप आयुक्त (सा.प्र.वि),
पिंपरी चिंचवड महानगरपालिका,

C:\Users\Lenovo\Desktop\palkhi.docx